प्रेषक :
कार्यवाह,
**महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड**
महाराष्ट्र सेवा संघ मार्ग व
जवाहरलाल नेहरु मार्ग संयोग,
मुलुंड (पश्चिम), मुंबई ४०० ०८०
www.mssmulund.com
E-mail - mss_mulund@rediffmail.com

संकल्पना : जयप्रकाश बर्वे, चंद्रशेखर कुलकर्णी, रचना : प्र.र. सप्रे, छपाई : साक्षी

रजि.क्र. एफ्४०२० स्थापना १९३७

॥ कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

**कोरोनाविरुद्धचा लढा ....**




**... आपण शिस्तबद्ध वागून जिंकूया !!**

## वार्षिक अहवाल
## २०२०-२१




महाराष्ट्र सेवा संघाचा सु.ल. गद्रे साहित्यिक पुरस्कार



साहित्य सम्राट न.चिं केळकर ग्रंथालयाचा 'साहित्य साधना पुरस्कार'



लोकसहभागातून आरोग्य सुविधा विकास या 'स्तापी' च्या साहाय्याने सुरू केलेल्या प्रकल्पाचा शुभारंभ




महाराष्ट्र सेवा संघ, ऐरोली शाखा - कु. ओस मराठे



'वसा' या संस्थेकडून ऑक्सिजन कॉन्संट्रेटर्स ची भेट

## महाराष्ट्र सेवा संघाचे मुलुंड व ऐरोली येथील विविध उपक्रम

- विविध कार्यांसाठी अद्ययावत सोयींनी युक्त व विविध क्षमतांची वातानुकूलित सभागृहे
- चित्रप्रदर्शनासाठी अद्ययावत कलादालन
- न.चिं. केळकर ग्रंथालय / सुनीता म. देवधर ग्रंथालय
- विनामूल्य वृत्तपत्र वाचनालय
- ज्ञानेश्वर पुस्तक पेढी
- संस्कृत रसास्वाद वर्ग / संस्कृत भाषा शिक्षण वर्ग
- पं. लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार
- अर्थविभाग / उद्योजक सन्मान सोहळा
- आरोग्य विभाग व स्वास्थ्यविषयक कार्यक्रम/ भौतिक उपचार केंद्र
- मैत्रेयी / मैत्री महिला शाखा / संस्कारवर्ग / ग्राहकपेठ
- सुयोग्य संस्थांच्या सहकार्याने संयुक्त कार्यक्रम
- अक्षर मैत्री व स्नेहसंवाद
- नृत्य झंकार / नाट्य कक्ष
- गिरिमित्र संमेलन / युवा विविध गुणदर्शन संमेलने
- विविध विषयांवर व्याख्यानमाला
- पुस्तक (ग्रंथ)जत्रा
- गुणवंत विद्यार्थी गौरव / ज्येष्ठ शिक्षक सन्मान
- वार्षिक साहित्यिक पुरस्कार
- वार्षिक कलाकार पुरस्कार
- वार्षिक सामाजिक संस्था पुरस्कार / सावित्रीबाई फुले स्त्री गौरव पुरस्कार
- वर्धापनदिन सोहळा
- सभासदांसाठी वर्षासहल
- संगीत सभा / क्रीडा विचार मंथन
- चित्रकला प्रदर्शन/ युवा वाटचाल
- अभ्यासिका
- दृष्टिसेवा केंद्र
- विज्ञान विभाग
- सॅल्यूट इंडिया / प्रेरणा पुरस्कार
- आपुलकी - वार्तापत्र

CORONAVIRUS INSTRUCTION



।।श्री।।

नमस्कार,

**'सरणार कधी रण तरी हे, कुठवर साहू घाव शिरी...'** अशीच अवस्था कोरोना विरुद्धची लढाई लढताना, अहवाल वर्षी सगळ्यांची झाली आणि अजूनही त्यात फरक पडलेला नाही. गेल्या वर्षी वाटलं होतं की लवकरच सगळं संपेल आणि पुन्हा एकदा सेवा संघात जोमाने कार्यक्रम करायला सुरुवात करू. पण कसचं काय?, उलट गेले वर्ष बरे होते, असं म्हणायची वेळ अहवाल वर्षात संस्थेवर आली. संस्थेच्या सभागृहांची नोंदणी कमी/रद्द झाल्याने संस्थेचे आर्थिक नुकसान झाले. त्यामुळे संस्थेला, मुलुंड वास्तूतील सु.ल. गद्रे सभागृहाच्या नूतनीकरणाचा कार्यक्रम पुढे ढकलावा लागला. संस्थेच्या परिवारातील स्व. रवींद्र लाडांसारखी अभ्यासू, मेहनती, सेवा संघावर मनापासून प्रेम करणारी व्यक्ती अहवाल वर्षात काळाच्या पडद्या आड गेली. सदर अहवाल तयार करण्याच्या प्रक्रियेच्या कालावधीत संस्थेचे सन्मान्य सभासद श्री. वसंत रानडे व संस्थेचे माजी विश्वस्त श्री. चंद्रकांत खरे यांचे निधन झाले. असे जरी असले तरी 'शो मस्ट गो ऑन' या उक्तीप्रमाणे संस्थेचे कार्य (बऱ्याच प्रमाणात 'ऑनलाईन') सुरू होते.

शासकीय नियमांचे पालन करून वाचकांना जास्तीत जास्त दिवस ग्रंथ सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न, संस्थेच्या मुलुंड व ऐरोली येथील ग्रंथालयांनी अहवालवर्षी केला. कोरोना साथीमुळे प्रत्यक्ष सभागृहांमध्ये कार्यक्रम आयोजित करता आले नाहीत तरी, विविध विभागांनी केलेल्या 'ऑन लाईन' कार्यक्रमांच्या आयोजनाने ही उणीव मोठ्या प्रमाणात भरून काढली. ऑन लाईन कार्यक्रमांमुळे सेवा संघाला देश-विदेशातून नवीन रसिक मिळाले. मैत्रेयी - केळकर ग्रंथालयाने संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'मला काय वाटतं?' या अनोख्या लेखन स्पर्धेत याचा प्रत्यय आला. या स्पर्धेतील पहिली दोन पारितोषिके पुण्यातील स्पर्धकांना गेली तर चौथे चक्क अमेरिकेतील स्पर्धकाला गेले. अहवालवर्षी ऑनलाईन 'वाचक संवादाला' मिळालेला प्रतिसाद लक्षणीय होता.

अर्थ विभाग, विज्ञान विभाग, आरोग्य विभाग, ऐरोली ग्रंथालय यांनी तर अनेक उत्तमोत्तम ऑनलाईन व्याख्यानांच्या आयोजनातून रसिकांना सेवा संघाशी बांधून ठेवले. 'डिजिनोव्हा २०२१' या ७ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी अनोख्या ऑनलाईन स्पर्धेचे आयोजन करून, विज्ञान विभागाने महाराष्ट्र सेवा संघाच्या इतिहासात प्रथमच 'विज्ञान दिन' पूर्णपणे ऑनलाईन साजरा केला. १५ ऑगस्टचा 'स्वातंत्र्य दिन' 'सॅल्यूट इंडिया'ने वेबिनार स्वरूपात दोन दिवस साजरा केला. संस्कृत पंडित श्री. प्रभाकर भातखंडे यांच्या 'श्रीमद्भगवदगीतेच्या 'भक्ती योग' या १२ व्या अध्यायावरील ध्वनिचित्र मुद्रित प्रवचनांचे सुंदर प्रसारण करून आणि संस्कृत अभ्यासक श्री. चंद्रशेखर वझे यांच्या 'स्तोत्र मंत्र पठण' वर्गाचे आयोजन करून संस्कृत विभागाने संस्कृत प्रेमी रसिकांना भक्ती रसात डुंबवले. 'गिरिमित्र' विभागाच्या कार्यक्रमांना कोरोनापेक्षा जास्त फटका, गिरिमित्र विभागाचे अध्वर्यू, सर्वांना बरोबर घेऊन प्रत्येक गिरिमित्र संमेलन यशस्वी करणाऱ्या रवींद्र लाड यांच्या अकस्मिक निधनाचा बसला. एखाद्या विषयात झोकून देऊन काम करणे म्हणजे काय असते, हे रवींद्र लाडांमुळे सगळ्यांनी अनुभवले. गिरिमित्र विभागाने आयोजित केलेल्या स्व. लाड यांच्या शोक सभेत व्यक्त झालेल्या अनेकांचे हेच मत होते.

अहवाल वर्षी आरोग्य विभागाला 'STAPI' या राज्यस्तरीय संस्थेच्या माध्यमातून ' COMMUNITY ACTION FOR HEALTH' या प्रकल्पावर काम करण्याची संधी मिळाली. आरोग्य विभागातर्फे हा चार महिन्यांचा प्रायोगिक तत्त्वावरील प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करण्यात आला. कोरोना साथीच्या काळात सुद्धा संस्थेचे 'वैशाली नगर' येथील आरोग्य केंद्र पूर्णपणे कार्यरत होते. दृष्टीसेवा केंद्रातर्फे मार्च २०२० मध्ये शालांत परीक्षेला बसलेले सर्व विद्यार्थी उत्तम गुणांनी यशस्वी झाले.

ऐरोली शाखेतसुद्धा उत्तम कार्यक्रम झाले. 'ऑनलाईन वाचनानंद' कार्यक्रमाद्वारे ऐरोलीच्या सुनीता देवधर ग्रंथालयाने विविध विषयांवर, माहितीपर व्याख्याने सादर केली. डॉ. अरुण औटी यांचे कोरोनावरील व्याख्यान किंवा श्री. अमृत देशमुख यांचे वाचनाचे महत्त्व सांगणारे व्याख्यान किंवा स्पर्धा परीक्षांसाठी तयारी कशी करावी हे सांगणारे व्याख्यान असो, या सर्व ऑनलाईन व्याख्यानांनी रसिकांची मने जिंकली. ऐरोली शाखेचे कार्यवाह श्री. शं. गो. वीरकर यांनी सादर केलेल्या 'कथा ओसामा बिन लादेनच्या मृत्यूची' या सुंदर कथाकथनाचा कार्यक्रम, श्री. वीरकर यांच्या स्मरणशक्तीला व सादरीकरणाला दाद देऊन गेला.

कोरोना काळात संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या सहकार्याबरोबरच, मुलुंड व ऐरोली शाखेतील व्यवस्थापन, सेवक वर्ग आणि केटरिंग कंत्राटदार मे. सतीश कामत , मे. नाटेकर डेकोरेटर्स व त्यांचे सहकारी या सर्वांचे सहकार्य मोलाचे ठरले.

कोरोनाने जगण्याचे बरेचसे संदर्भच बदलले. 'ऑनलाईन' आता परवलीचा शब्द झाला. तरीपण कुठल्याही कार्यक्रमाचे प्रत्यक्ष सादरीकरण बघताना समोरासमोर मिळणारी दाद, ते भारलेले वातावरण हे 'ऑनलाईन' कधीच मिळणार नाही. त्यामुळे कोरोनाचे संकट दूर होऊन, ते 'भरपूर कार्यक्रमांचे' आनंदाचे दिवस परत यावेत, संस्थेच्या सभागृहांची नोंदणी वाढून संस्थेची आर्थिक स्थिती सुधारावी ही परमेश्वरचरणी प्रार्थना. मात्र तोपर्यंत टिकून राहण्यासाठी सगळ्यांच्याच सहकार्याची गरज आहे.

... चंद्रशेखर कुलकर्णी,

अध्यक्ष.



Ahval text20 21.indd 1 7/24/2021 1:39:52 PM

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

**विश्वस्त मंडळ**

श्री. चंद्रशेखर म. कुलकर्णी (अध्यक्ष - पदसिद्ध)
डॉ. आनंद रा. कट्टी
श्री. उल्हास कृ. हंबर्डे
श्री. किरण रा. देशमुख
श्री. चंद्रशेखर ना वझे
श्री.अजित ग. करंदीकर
श्री. रमेश दे. धामणकर

**कार्यकारी मंडळ**

**पदाधिकारी**

श्री.चंद्रशेखर म. कुलकर्णी (अध्यक्ष )
श्री.जयप्रकाश र. बर्वे - कार्यवाह
श्री. प्रकाश ह. सडेकर-कोषाध्यक्ष
श्री.विनोद म. सौदागर -उपाध्यक्ष
श्री. अवधूत पं. गोळे - सहकार्यवाह
श्री.धनंजय दि. दिवेकर- सहकोषाध्यक्ष

**सदस्य**

श्री.रवींद्र द. लाड
श्री.विनायक ज. जोगळेकर
श्री. सतीश श्री. पाटणकर
श्री. शंकर गो. वीरकर
श्री. किशोर पेंढरकर
(स्वीकृत २७.९.२०२० पासून)
श्रीमती नंदिनी हंबर्डे
(स्वीकृत २७.९.२०२० पासून)
श्री.प्रदीप र. सप्रे
श्री. विजय वा. वझे
श्री. अरुण मो. भंडारे
श्री. नितीन देशपांडे
(स्वीकृत २७.९.२०२० पासून)
श्री. सुधीर बागाईतकर
(स्वीकृत २७.९.२०२० पासून)

**ऐरोली व्यवस्थापन समिती**

श्री. प्रदीप र. सप्रे - अध्यक्ष
श्री. किशोर पेंढरकर -कोषाध्यक्ष
श्री. चंद्रशेखर म. कुलकर्णी (पदसिद्ध)
श्री. शंकर गो. वीरकर - कार्यवाह
श्री. सुधीर बागाईतकर -सहकार्यवाह
श्री. जयप्रकाश बर्वे (पदसिद्ध)

**मानद अंतर्गत हिशेब तपासनीस**

श्री. श्रीहरी भी. कुलकर्णी (मुलुंडसाठी), श्री. घनश्याम बा. कवठणकर(ऐरोलीसाठी)

**हिशेब तपासनीस**

मेसर्स सिंगवी, ओतुरकर, केळकर आणि कंपनी (सी. ए.)



Ahval text20 21.indd 2 7/24/2021 1:39:58 PM

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

**मुख्य कार्यालय व्यवस्थापन वर्ग**

श्री. संदीप परब : व्यवस्थापक
श्रीमती सुमिता पवार

**मुख्य कार्यालय सेवक वर्ग**

श्री. मोहन पवार
श्री. श्रीरंग भाष्टे
श्री. भास्कर इंगळे
श्री. दिनेश रसाळ

**साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती श्रद्धा गोविलकर - ग्रंथपाल
श्रीमती आरती रणदिवे
श्री. योगेश मोडक

**साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय सेवक वर्ग**

श्री. प्रदीप वाईकर
श्री. उमेश काणेकर

**ऐरोली शाखा कार्यालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती प्रियांका शाळीग्राम (व्यवस्थापक)
श्रीमती कविता मोढवे
श्रीमती केतकी जाधव
श्रीमती रेणुका गोखले

**ऐरोली शाखा कार्यालय - सेवक वर्ग**

श्री. रमेश झोंबाड
श्री. शंकर शिंगोटे
श्री. सुरेंद्र राणे
श्री. शिवाजी पिसाळ

---

**महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड**
म. से. संघ मार्ग व पं. जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.), मुंबई ४०० ०८०
दूरध्वनी : ०२२-२५६८१६३१/२५६९ ०२२५
e-mail: mss_mulund@rediffmail.com
Web Site: www.mahasevasangh.org

**ऐरोली शाखा**
म. बा. देवधर संकुल, म. से. संघ मार्ग, सेक्टर १७,
ऐरोली, नवी मुंबई - ४००७०८
दूरध्वनी : ०२२-२७७९१८३७/ २७७९०८३६
e-mail : mss.airoli@rediffmail.com



Ahval text20 21.indd 3 7/24/2021 1:39:58 PM

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

म. से. संघ मार्ग व पंडित जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.)
मुंबई - ४०० ०८०

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड संस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा (अहवाल वर्ष १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१) रविवार, दि. ०८ ऑगस्ट २०२१ रोजी सायंकाळी ५.३० वा. संस्थेच्या मुलुंड येथील सु. ल. गद्रे सभागृहात सुरक्षित अंतर (सोशल डिस्टन्सिंग) व आरोग्य सुरक्षांच्या सर्व नियमांचे पालन करून, आयोजित करण्यात आली आहे. अध्यक्षांच्या प्रास्ताविकानंतर खालील कामांचा सभेत विचार होईल. या सभेला सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

## सभेपुढील कामे

१. दि. २७.०९.२०२० रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करणे व इतिवृत्तांत निर्देशित केलेल्या मुद्यांबाबतच्या कार्यवाहीची माहिती घेणे आणि इतिवृत्त कायम करणे.
२. कार्यकारी मंडळाने तयार केलेल्या २०२०-२१ सालच्या अहवालास मान्यता देणे.
३. संस्थेच्या वैधानिक हिशेब तपासनिसांनी तपासलेल्या व विश्वस्त आणि कार्यकारी मंडळाने संमत केलेल्या २०२०-२१ सालच्या उत्पन्न व खर्चाचे हिशेब आणि आर्थिक ताळेबंदास मान्यता देणे.
४. २०२१-२२ सालाकरिता अंदाजपत्रक संमत करणे.
५. २०२१-२२ सालाकरिता वैधानिक हिशेब तपासनिसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
६. २०२१-२२ सालाकरिता मानद अंतर्गत हिशेब तपासनिसांची नियुक्ती करणे.
७. घटना कलम ११(ब) नुसार सभासदांकडून आलेल्या सूचनांचा विचार करणे.
८. घटना कलम १३(२) नुसार विश्वस्त मंडळातून निवृत्त होणाऱ्या १ सदस्याची जागा भरणे.
९. घटना कलम १८(९)नुसार कार्यकारी मंडळातून निवृत्त होणाऱ्या ३ सदस्यांच्या व स्व. रवींद्र लाड यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या अशा एकूण ४ जागा भरणे.
१०. ऐरोली शाखेच्या कार्याची माहिती घेणे.
११. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी आयत्या वेळची कामे.

## विशेष सूचना

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब झालेली सभा ३० मिनिटांनंतर त्याच जागी भरेल व त्या सभेत आधीच्याच तहकूब झालेल्या सभेचे कामकाज राहील. या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. सभासदांना सभांची इतिवृत्ते, हिशेबाच्या वह्या इ. पूर्वसूचनेने सोमवार, दि. २६ जुलै ते बुधवार, दि.०४ ऑगस्ट२०२१ पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ०७.३० या वेळेत (सुटीचे दिवस सोडून) कार्यालयांत पाहण्यास मिळतील.
३. कोणत्याही सभासदास काही माहिती हवी असल्यास अथवा काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी त्या दि.०४ ऑगस्ट २०२१ पर्यंत कार्यालयीन वेळांत लेखी स्वरूपात द्याव्यात.
४. सभासदाने आपला पत्ता बदलला असल्यास संस्थेस कळवावा.
५. संस्थेच्या सभासदांची यादी संस्थेच्या कार्यालयांत सभासदांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळांत उपलब्ध होईल. ज्या सभासदाचे नाव यादीत चुकून आले नसेल त्याने ताबडतोब कार्यालयात लेखी कळवावे.
६. विश्वस्त मंडळावरून श्री किरण देशमुख निवृत्त होत आहेत. तसेच कार्यकारी मंडळातून सर्वश्री जयप्रकाश बर्वे, विनोद सौदागर अरुण भंडारे निवृत्त होत आहेत व ते पुन्हा निवडणुकीस उभे राहण्यास पात्र आहेत.



Ahval text20 21.indd 4 7/24/2021 1:39:58 PM

**निवडणूक कार्यक्रम**

१. निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सर्वश्री प्रदीप नाटेकर, मधुसूदन बर्वे व श्रीमती प्रियांका मोकाशी यांची निवडणूक समिति नियुक्त करण्यात आली आहे. श्री. प्रदीप नाटेकर निवडणूक समितीचे प्रमुख असतील.

२. विश्वस्त मंडळातील १, तसेच कार्यकारी मंडळातील ४ जागांसाठी निवडणूक रविवार, दि.०८ ऑगस्ट २०२१ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळेत गुप्त मतदान पद्धतीने होईल. ३१.३.२०२० पर्यंत सभासद झालेल्या व्यक्तींनाच या निवडणुकीत मतदान करता येईल.(सभासद क्र. आजीव९८२ पर्यंत)

३. निवडणुकीची नामांकन पत्रे दि. २६ जुलै २०२१ ते ०३ ऑगस्ट २०२१ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळांत मिळतील.

४. निवडणुकीची नामांकन पत्रे स्वीकारण्याची वेळ दि.०३ ऑगस्ट २०२१ रोजी सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत आहे.
नामांकन पत्रांची छाननी दि. ०४ ऑगस्ट २०२१ रोजी सायंकाळी ७.०० वाजता करण्यात येईल.

५. छाननीनंतर वैध उमेदवारांची यादी दि. ०४ ऑगस्ट २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. नामांकन पत्र मागे घेण्याची वेळ दि.०५ ऑगस्ट २०२१रोजी सायंकाळी ७.३० वाजेपर्यंत असेल.

६ निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची अंतिम यादी दि.०६ ऑगस्ट २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

मुलुंड, दि. १९ जुलै २०२१

जयप्रकाश बर्वे
(कार्यवाह)

**टीप :**

- या वर्षी सभासदांना अहवालाची मुद्रित प्रत घरी न पाठवता, अहवालाची पीडीएफ कॉपी संस्थेच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्याचा निर्णय संस्थेच्या कार्यकारिणी ने घेतला आहे.
- या निर्णयानुसार सभासदांना अहवालाची पीडीएफ कॉपी संस्थेच्या mahasevasangh.org , या संकेत स्थळावर दि.२५.०७.२०२१ पासून उपलब्ध होईल.
- ज्या सभासदांना अहवालाची मुद्रित प्रत हवी असेल, त्यांना ती दि.२५.०७,२०२१ पासून संस्थेच्या मुलुंड कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळेल.
- वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी देखील अहवालाच्या मुद्रित प्रती सभेला उपस्थित राहाणाऱ्या सभासदांना उपलब्ध करून देण्यात येतील.
- सभेनंतर सभासदांच्या स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचा सभासदांनी अवश्य लाभ घ्यावा.

**ऋणनिर्देश** : मुलुंड व ऐरोलीतील सर्व स्थानिक लोकप्रतिनिधी, पोलीसखाते, मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई महानगर पालिका, धर्मादाय आयुक्त, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र शासन, सिडको, वृत्तपत्रे , आकाशवाणी, दूरदर्शन, सर्व दूरचित्रवाहिन्या, सर्व वार्ताहर, आय.डी.बी.आय. बँक लि., बँक ऑफ बरोडा, ठाणे जनता सहकारी बँक लि; स्टेट बँक ऑफ इंडिया, अपना बाजार, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ग.क. खांडेकर वाचनालय, पॉप्युलर प्रकाशन, ज्येष्ठ नागरिक संघ, मुलुंड पूर्व, रोटरी क्लब ऑफ मुलुंड, श्री. दीपक शहा, बॉम्बे मेडिकल एड फाऊंडेशन, दृष्टिसेवा केंदासाठी काम करणारे कर्मचारी, शिक्षकवर्ग, मदतनीस तसेच 'नॅब' यांचे तसेच गिरिमित्र संमेलनाचे तसेच इतर उपक्रमांचे सर्व देणगीदार, महाराष्ट्र सेवा संघाच्या सहकार्याने विविध उपक्रमांचे संयुक्त आयोजन करणाऱ्या सर्व संस्था व त्यांचे पदाधिकारी, संस्थेला विविध सेवा पुरविणारे सर्व कंत्राटदार, श्री. सतीश कामत , श्री. राजाराम नाटेकर, वैधानिक हिशेब तपासनीस मे. सिंघवी ओतूरकर व केळकर आणि कंपनी, मानद अंतर्गत हिशेब तपासनीस श्री. श्रीहरी भी. कुलकर्णी व श्री. घनश्याम बा. कवठणकर, 'महाराष्ट्र टाइम्स'चे श्री. पराग करंदीकर, श्री. विलास परुळेकर, श्री.समीर कर्वे, वैभव वझे, 'लोकसत्ता' चे श्री. विकास महाडिक, अभ्युदय बँक, कॉर्पोरेशन बँक, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर, मुलुंड व ऐरोलीचे सर्व कार्यकर्ते आणि आमचे सर्व सभासद, हितचिंतक, व संस्थेचे सर्व काम आपुलकीने करणारा आमचा मुलुंड व ऐरोली येथील कार्यालय व ग्रंथालय व्यवस्थापन , सेवक वर्ग या सर्वांनी दिलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल आम्ही ऋणी आहोत.

जयप्रकाश बर्वे, (कार्यवाह) चंद्रशेखर कुलकर्णी,(अध्यक्ष)



Ahval text20 21.indd 5 7/24/2021 1:39:58 PM

**पदाधिकारी सभा - उपस्थिती तपशील**

| अनु.क्र. | पदाधिकाऱ्याचे नाव | विश्वस्त | विश्वस्त व कार्यकारी मंडळ | कार्यकारी मंडळ |
|---|---|---|---|---|
| | **एकूण सभा →** | **१** | **५** | **४** |
| १ | श्री.चं.म.कुलकर्णी | १ | ५ | ३ |
| २ | श्री. चं.ना.वझे | १ | ५ | - |
| ३ | श्री.आ.रा. कट्टी | १ | ५ | - |
| ४ | श्री.र.दे. धामणकर | १ | ४ | - |
| ५ | श्री.अ.ग. करंदीकर | १ | ० | – |
| ६ | श्री. उ.कृ.हंबर्डे | १ | ५ | - |
| ७ | श्री. कि.रा. देशमुख | १ | ५ | - |
| ८ | श्री.ज.र.बर्वे | | ५ | ४ |
| ९ | श्री.ध.दि.दिवेकर | | २ | १ |
| १० | श्री.र.द.लाड | | ४ | ३ |
| ११ | श्री.अ.मो.भंडारे | | ५ | ४ |
| १२ | श्री.वि.म. सौदागर | | ५ | ४ |
| १३ | श्री. प्र.र. सप्रे | | ४ | ३ |
| १४ | श्री.वि.ज.जोगळेकर | | ५ | ४ |
| १५ | श्री.वि.वा.वझे | | ५ | ४ |
| १६ | श्री.स.श्री.पाटणकर | | ५ | ३ |
| १७ | श्री. अ.पं. गोळे | | ५ | ४ |
| १८ | श्री.प्र.ह.सडेकर | | ५ | ४ |
| १९ | श्री.सु.वा. बागाईतकर | | ३ | १ |
| २० | श्री.शं.गो.वीरकर | | ४ | २ |
| २१ | श्री. नितीन देशपांडे | | ५ | ३ |
| २२ | श्रीमती नंदिनी हंबर्डे | | ३ | ४ |
| २३ | श्री.किशोर म. पेंढरकर | | ३ | २ |

**सभासदांना मिळणाऱ्या सवलती**

संस्थेच्या सभासदांस, सभासदत्वास एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर केवळ त्यांच्या स्वतःच्या किंवा त्यांच्या मुलांच्या वा मुलींच्या लग्न, मौंजीबंधन, या कार्यांसाठीच सु.ल.गद्रे सभागृहाच्या भाड्यात रु.३,०००/- व सभागृह क्र.२च्या भाड्यात रु. २,०००/-ची सूट मिळते. एका सत्रासाठी नोंदणी केल्यास अनुक्रमे रु.१,५००/- व रु.१,०००/-ची सूट मिळते. तसेच ऐरोली येथे सभागृहाच्या भाड्यात रु.१,०००/- ची सूट मिळते.

**सभासद संख्या**

| सभासद श्रेणी | मार्च२०अखेर सभासद संख्या | अहवालसाली झालेले सभासद | दिवंगत झालेले सभासद | मार्च २१ अखेरीस सभासद संख्या |
|---|---|---|---|---|
| सन्माननीय | १२ | – | १ | ११ |
| आधारस्तंभ | १३ | – | – | १३ |
| आश्रयदाते | ५ | – | – | ५ |
| पत्ता माहीत नसलेले | | | | |
| आजीव | ९७८ | ४ | २ | ९८० |
| **एकूण** | **१००८** | **४** | **३** | **१००९** |

**अहवाल वर्षी सांस्कृतिक सभासद - मुलुंड येथे ९ , ग्रीन सभासद- ३३ / ऐरोली येथे -०**

सभागृह नोंदणीचा तपशील - अहवालवर्षी आपल्या संस्थेच्या सभागृहांत झालेले कार्यक्रम -

**करोना पार्श्वभूमीवर सर्व शासकीय बंधने पाळून, मुलुंड वास्तू**

| कार्यक्रम | सभागृह क्र.१व२ | सभागृह क्र.१व२ | सभांगण | सभागृह क्र.४ |
|---|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | ६ पू | १२स.<br>६ संध्या.<br>१संस्था कार्यक्रम | — | ३स.<br>४संध्या |

**ऐरोली वास्तू - करोना पार्श्वभूमीवर सर्व शासकीय बंधने पाळून**

| कार्यक्रम | सभागृह क्र.१ वातानुकूलित | सभागृह क्र.१ बिगर वातानुकूलित | तळमजला | सभागृह क्र.२ |
|---|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | १पू/५स | १पू/६स | -- | **१ वातानुकूलित**<br>**५ बिगर वातानुकूलित** |

पू -पूर्ण वेळ, स-सत्रवार,

**श्रद्धांजली :**

रविंद्र लाड (आजीव५०२), मोहन चौगुले (आजीव ५२० ) , माजी विश्वस्त श्री.चं.दि.खरे, श्रीमती वसुधा महाबळ, श्री.सुरेश मांगले (आजीव ३४५), श्री.वसंत रानडे (सन्माननीय सदस्य) या सभासदांचे व मोहन पवार (महाराष्ट्र सेवा संघाच्या सेवेतील कर्मचारी) यांचे अहवालवर्षात निधन झाले. त्यांना संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली!

भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती प्रणव मुखर्जी, नांगुर्ले,कर्जत येथे संस्थेचे आरोग्य केंद्र चालविणारे डॉ.दिपक घुमे, चित्रपट अभिनेते इरफानखान, ऋषी कपूर, जेष्ठ सिने पत्रकार, लेखिका ललिता ताम्हणे, ज्येष्ठ पत्रकार दिनू रणदिवे, सुलेखनकार कमल शेडगे, माजी निवडणूक आयुक्त व लेखिका नीला सत्यनारायण, दादर सार्वजनिक वाचनालयाचे श्री.दत्ता कामत, सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. जसराज, प्रसिद्ध विचारवंत, लेखिका प्रा. पुष्पा भावे, ज्येष्ठ अभिनेत्या शशिकला, आशालता वाबगावकर, ज्येष्ठ अभिनेते रवी पटवर्धन, व डॉ.शीतल आमटे तसेच 'ज्ञानशलाका' पाक्षिकाचे सुरेश मांगले जे आपले ग्रंथालय सभासद देखील होते, या सर्वांचे अहवालसाली निधन झाले, अशा सर्वांना महाराष्ट्र सेवा संघ परिवारातर्फे विनम्र श्रद्धांजली!



Ahval text20 21.indd 7 7/24/2021 1:39:58 PM

**महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड व ऐरोली शाखांच्या उपक्रमांसाठी तसेच स्थिर निधीसाठी मिळालेल्या देणग्या**

| अनु. क्र. | तपशील | रुपये |
|---|---|---|
| | | |
| **विविध पुरस्कारांसाठी तसेच संस्थेच्या उपक्रमांसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्रीमती सविता गद्रे (सु.ल. गद्रे पुरस्कारांसाठी) | १,५०,००० |
| २ | श्री. चंद्रशेखर म. कुलकर्णी | २०,००० |
| ३ | श्री. लक्ष्मण भोळे | १०,००० |
| ४ | श्री. प्रभाकर भातखंडे | ८,१०० |
| ५ | श्री. राजन कासले | ७,५०० |
| ६ | श्री.सुधीर वसंत वाड | ५,००० |
| ७ | श्री. रवींद्र पोंक्षे | ५,००० |
| ८ | श्री. विवेक चंदन | ५,००० |
| ९ | श्री. चंद्रकांत दि. खरे | ५,००० |
| १० | श्री. मुकुंद द. भुसारी | ३,००० |
| ११ | इतर देणग्या | १,२८,१०० |
| | | |
| **ग्रंथालयासाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री. सु.ना. पाटणकर (साहित्य साधना पुरस्कारासाठी) | २५,००० |
| २ | श्री. सु.ना. पाटणकर (ज्ञानेश्वर पुस्तक पेढीसाठी ) | २,००० |
| ४ | श्री. अरुण भंडारे | ७,५०० |
| ३ | श्री. दत्तात्रय व. कुलकर्णी | २,००० |
| **दृष्टिसेवा अभ्यासिकेसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री. प्रभाकर श्री. कराडकर | १५,००० |
| २ | श्रीमती मीनल शेठ | ५,००० |
| ३ | श्री. दत्तात्रय व. कुलकर्णी | ५,००० |
| ४ | श्री.सदाशिव पोतदार | ५,५०० |
| ५ | श्री. सुहास कराडकर | ५,००० |
| ६ | श्री. ए.जी. बावस्कर | ५,००० |
| ७ | श्री. यतीन पोवळे | ५,००० |
| ८ | इतर देणग्या | १०,५०२ |



Ahval text20 21.indd 8 7/24/2021 1:39:58 PM

**संस्थेने दिलेल्या देणग्या**

| अनु. क्र. | देणगी दिलेली संस्था | देणगी रक्कम- रुपये |
|---|---|---|
| १ | महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था | ५,००० |
| २ | कोविड साठी मुख्यमंत्री मदत निधी | ७५,००० |
| ३ | कोविडसाठी पंतप्रधान मदत निधी | ७५,००० |
| **कोविडसाठी पंतप्रधान निधीसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री. जयप्रकाश बर्वे | ५,००० |
| २ | श्री. चंद्रशेखर वझे | ५,००१ |
| ३ | श्री. विनायक जोगळेकर | ५,००० |



**रवींद्र लाड :** ज्येष्ठ इतिहास संशोधक, अध्यक्ष - कला विभाग, महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड, अध्यक्ष - कोकण इतिहास परिषद, गिरिमित्र संमेलनाचे जनक व आधारस्तंभ. आपल्या चाळीस वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी सामाजिक कार्य, इतिहास संशोधन, गिरिमित्र संमेलन अशा क्षेत्रांत निष्ठा व निःस्वार्थी वृत्तीने खूप महत्त्वाचे योगदान दिले. १६ जानेवारी २०२१ ला त्यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली !

**वसंत रानडे :** महाराष्ट्र सेवा संघाचे सन्माननीय सदस्य असलेले वसंत रानडे यांचा जन्म ३ मार्च १९३९ रोजी जबलपूर



येथे झाला. दहावीपर्यंतचे शिक्षण तिथेच झाल्यावर ते भारतीय नौदलात दाखल झाले. तिथून निवृत्त झाल्यावर त्यांनी टाटा कन्सल्टिंग इंजिनिअर्स मध्ये ॲडमिनिस्ट्रेशन ऑफिसर म्हणून काही काळ नोकरी केली. ते विश्व हिंदू परिषदेचे सक्रिय कार्यकर्ते होते. याच सुमारास ते तलासरी येथे वनवासी कल्याण आश्रमाच्या केंद्राचे कामही करत होते. ते काम त्यांनी २००५ पर्यंत केले. त्यानंतर मुलुंडला राहायला आल्यावर त्यांनी मुलुंड मध्ये मोठे सरकारी रुग्णालय व्हावे असा ध्यासच घेतला होता. त्यासाठी त्यांनी मंत्रालय आणि महानगरपालिकेत शेकडो फेऱ्या मारल्या असतील. मुलुंडमध्ये असलेल्या पालिकेच्या सावरकर रुग्णालयाच्या आवारात स्वा. सावरकर यांचा पुतळा उभारण्यात त्यांचा मोठा सहभाग होता. सध्या पुण्यात असलेल्या विकलांग माजी सैनिकांसाठी काम करणाऱ्या एका संस्थेला मदत करण्यात ते गुंतले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, नात, मुलगी, जावई, नातू असा परिवार आहे. त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली !



**मोहन चौगुले :** महाराष्ट्र सेवा संघाच्या कलाविभागाच्या कार्यात नाट्यविषयक उपक्रमांत मोहन चौगुले यांचा मोलाचा सहभाग होता. त्यांनी संस्थेच्या मराठी, संस्कृत, संगीत मराठी नाटकांतून कामे केली होती. संस्थेसाठी अनेक कार्यक्रमांचे त्यांनी आयोजन केले होते. त्यांचे या अहवालवर्षात आकस्मिक निधन झाले. त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली!



Ahval text20 21.indd 9 7/24/2021 1:39:58 PM

**महाराष्ट्र सेवा संघाचे श्रीमती सविता गद्रे पुरस्कृत विविध पुरस्कार व इतर कार्यक्रम**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | १५ ऑगस्ट २०२० | झेंडा वंदन | |
| २ | २४जानेवारी२०२१ | महाराष्ट्र सेवा संघाचा सु.ल. गद्रे साहित्यिक पुरस्कार | पुरस्कारप्राप्त साहित्यिक - श्री.राजन खान, प्रमुख पाहुण्या - श्रीमती प्रतिमा जोशी (लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या, पत्रकार (महाराष्ट्र टाईम्स) |

## संस्कृत विभाग

अध्यक्ष - गुरुप्रसाद कार्लेकर, कार्यवाह - सुमेधा नवाथे
सभासद : चंद्रशेखर वझे, भावना दांडेकर, वरदा नवाथे, निधी कार्लेकर, प्रसाद भिडे, जयप्रकाश बर्वे, चंद्रशेखर कुलकर्णी

करोना साथीच्या उद्रेकामुळे २३ मार्च २०२० पासून सुरू झालेल्या 'लॉकडाऊन' परिस्थितीमुळे विभागाच्या कार्यक्रम सादरीकरणात बंधने आली. परिस्थितीवर मात करून काही मोजके उपक्रम संस्थेच्या तंत्रज्ञानात निष्णात असलेल्या कार्यकर्त्यांच्या सहकार्याने 'झूम' ह्या दृक्श्राव्य माध्यमाद्वारे करण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यात आला.

**स्तोत्र मंत्रांचे प्रशिक्षण , सत्र दुसरे** : पहिल्या सत्राला मिळालेल्या प्रतिसादामुळे व सहभागींच्या आग्रहामुळे १४ जानेवारी २०२० पासून 'विष्णू सहस्त्रनाम' समजून देण्याची कार्यशाळा संस्थेचे विश्वस्त , माजी अध्यक्ष व सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ श्री. चंद्रशेखर वझे यांनी सुरू केली, परंतु लॉकडाऊन परिस्थितीमुळे ती खंडित करून मे महिन्यात दृक्श्राव्य माध्यमाद्वारे सहभागींच्या उत्कृष्ट प्रतिसादात पूर्ण करण्यात आली.

**वर्तमान कवि शोध, सत्र दुसरे** : संस्कृत दिनाच्या निमित्ताने ऑगस्ट महिन्यात संस्कृत संहिता लेखन स्पर्धा ई मेल द्वारे आयोजित करण्यात आली, परंतु लॉकडाऊन परिस्थितीत अपुऱ्या प्रतिसादास्तव ही स्पर्धा स्थगित करण्यात आली.

**ध्वनीचित्र मुद्रित प्रवचने :** अधिक मासानिमित्त पं. प्रभाकर भातखंडे ह्यांची 'श्रीमद्भगवतगीता - १२ वा अध्याय - भक्तियोग' यावरील ध्वनिमुद्रित प्रवचने २१ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर या कालावधीत प्रसारित करण्यात आली. आपले एक सभासद श्री. दीपक जाधव ह्यांनी काही वर्षांपूर्वी 'संस्कृत रसास्वाद' वर्गात या प्रवचनांचे ध्वनिमुद्रण केले होते. त्याचा पुनःप्रत्यय सहभागींना घेता आला. या कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळाला.

**सुमेधा नवाथे (कार्यवाह)** **गुरुप्रसाद कार्लेकर (अध्यक्ष)**



**चंद्रकांत दि. खरे :** संस्थेचे माजी विश्वस्त श्री. चंद्रकांत दि. खरे यांचे ६ जुलै २०२१ रोजी निधन झाले. श्री.खरे यांनी संस्थेत विश्वस्त, कार्यकारी मंडळ सदस्य, कर्मचारी वृंदासाठी वेतन समितीचे अध्यक्ष, निवडणूक समितीचे अध्यक्ष अशा विविध जबाबदाऱ्या अत्यंत जबाबदारीने व यशस्वीपणे पार पाडल्या. एक उत्कृष्ट रसिक व क्रियाशील वाचक म्हणून खरे यांचा संस्थेच्या विविध उपक्रमांमधील सहभाग लक्षणीय होता.संस्थेत सादर झालेल्या , पु.ल. देशपांडे यांच्या 'वाऱ्यावरची वरात' च्या खास प्रयोगात श्री.खरे यांनी पु.लं.ची भूमिका सुरेख केली होती.



Ahval text20 21.indd 10 7/24/2021 1:39:58 PM



## आरोग्य विभाग

र. दे. धामणकर - अध्यक्ष, विनायक जोगळेकर - कार्यवाह
सदस्य : अ. मो. भंडारे, र. द. लाड, प्रकाश सडेकर, वि. म. सौदागर, वि. सं. जोशी, पंकज पाठक, डॉ.नितीन पाटणकर

या वर्षी आरोग्य विभागाला 'नॅशनल हेल्थ मिशन' च्या माध्यमातून 'कम्युनिटी ॲक्शन फॉर हेल्थ' या प्रकल्पावर काम करण्याची संधी मिळाली. सरकारी आरोग्य यंत्रणा आणि आरोग्य सेवांचा लाभ घेणारे नागरिक यांच्यात समन्वय साधणे, लाभार्थींना सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यास मदत करणे , नागरिकांचा आरोग्य यंत्रणेवरील विश्वास वाढवणे, आरोग्य यंत्रणा आपल्या फायद्यासाठी आहे, तिचा लाभ घेणे तसेच सरकारी आरोग्य यंत्रणा सक्षम करणे हे आपले देखील कर्तव्य आहे याची जाणीव समाजात निर्माण करणे हे या प्रकल्पाचे प्रमुख उद्देश म्हणावे लागतील. महाराष्ट्र आरोग्य विभागाच्या वतीने 'स्तापी' (STAPI ) या राज्यस्तरीय संस्थेच्या अंतर्गत ठाणे जिल्हा मातृसंस्था म्हणून महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड ची निवड करण्यात आली होती. ठाणे जिल्ह्यातील शहापूर आणि मुरबाड या दोन तालुक्यांतील ६० गावे आणि १७ प्राथमिक आरोग्य केंद्रे हे संस्थेचे कार्यक्षेत्र होते. संस्थेमार्फत हा चार महिन्यांचा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करण्यात आला. आरोग्य विभागामार्फत 'ऑन लाईन' कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आले.

विनायक जोगळेकर , कार्यवाह र.दे धामणकर, अध्यक्ष

## आपुलकी

संपादक - चंद्रशेखर वझे, कार्यकारी संपादक - अरुण भंडारे, संपादन साहाय्य : विनोद सौदागर, सुषमा पाटणकर, रवींद्र लाड, नंदिनी हंबर्डे

या अहवालवर्षात 'आपुलकी'च्या संपादन साहाय्यक समितीचे एक सदस्य रवींद्र लाड यांचे आकस्मिक दु:खद निधन झाले.
'आपुलकी'ची वाटचाल यशस्वीपणे सुरू आहे. 'कोविड'च्या पार्श्वभूमीवर केवळ एकच अंक प्रसिद्ध करता आला. दिवाळी २०२० च्या प्रसंगी 'आपुलकी' च्या दिवाळी अंकाचे प्रकाशन झाले. हा अंक मात्र खूप देखणा होता व त्याला रामजन्मभूमीवरील यंदाच्या दिवाळीची सजावट दर्शविणारे सुरेख मुखपृष्ठ लाभले. या अंकाचे वैशिष्ट्य म्हणजे न.चिं. केळकर ग्रंथालय व मैत्रेयी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या २मला काय वाटते' लेखन स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचे सात लेख या अंकात समाविष्ट केले होते तसेच प्रेरणा पुरस्काराचे विजेये पॅरा कमांडो श्री. मधुसूदन सुर्वे आणि कमांडो व कीर्तीचक्र विजेते श्री.संतोष राळे यांच्या मुलाखतीही यात होत्या. 'आपुलकी'मुळे सेवा संघ परिवारातील अनेक जण लिहिते झाले.

अरुण भंडारे,
कार्यकारी संपादक, आपुलकी

**खुप मायाळू, माणुसकीचा, खऱ्या आपुलकीचा सहवास देणारी ही संस्था आणि इथली माणसं. महाराष्ट्र सेवा संघ, माणसांत असल्यासारखं वाटलं.**

**...राजन खान, ०४.०१.२०२१**



Ahval text20 21.indd 11 7/24/2021 1:39:58 PM

# मैत्रेयी- महिला विभाग

प्रियांका मोकाशी (अध्यक्ष) , नंदिनी हंबर्डे (कार्यवाह)
सदस्य : सुषमा पाटणकर, वासंती वैद्य , माधवी भुसारी, मेधा देव, वीणा नाटेकर, मीना वीरकर, मेधा देव

मैत्रेयी आणि न.चिं केळकर ग्रंथालयाच्या संयुक्त विद्यमाने ऑगस्ट महिन्यामध्ये 'मला काय वाटतं ?' या लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आमच्या अपेक्षेपेक्षा जास्त म्हणजे एकूण ७१ लेख मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापूर आणि अमेरिकेतून आपल्याकडे आले.
स्पर्धेचे विषय असे होते.
१) मुंबईची सहनसिद्धी, २) इतिहास दर्शन- रंजक की बोधक?, ३) टी.वी. मालिकांतून येणारी बधिरता, तारक की मारक?, ४) आजची पत्रकारिता मूल्याधिष्ठित आहे का?, ५) पु.लं.चा विनोद - आता होणे नाही?, ६) साहित्यातून कथा वाङमय एक्झिट घेत आहे का?
स्पर्धेचे परीक्षक होते : १) श्रीमती प्रतिभाताई गोपूजकर - समीक्षक व लेखिका, २) श्रीमती आरती कदम -फिचर एडिटर - लोकसत्ता
१५ सप्टेंबर २०२० ला या लेखन स्पर्धेचा निकाल आपण जाहीर केला आणि ७ नोव्हेंबरला कोविड १९ परिस्थितीत शासनाचे सर्व नियम पाळून अगदी मोजक्या प्रेक्षकांच्या उपस्थितीत आपण हा बक्षीस समारंभ केला.
स्पर्धेचे निकाल पुढील प्रमाणे - १)योगिनी पाळंदे (पुणे), २) मीना जोशी (पुणे), ३) सुगंधा कर्वे (मुलुंड-पूर्व), ४) सागर साबडे (अमेरिका), ५) बकुल बोरकर (विलेपार्ले), ६) श्रद्धा वझे (कल्याण), ७) अनिल वाळिंबे (मुलुंड)
सर्व विजेत्यांचे मनापासून अभिनंदन! तसेच आपले मान्यवर परीक्षक, आपले सर्व सहकारी यांचे विशेष आभार!
कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर मैत्रेयीने काही कार्यक्रम 'ऑनलाईन' पद्धतीने सादर केले.
२मार्च २०२१ : 'गप्पांच्या गावा जावे' - संवादात्मक कार्यक्रम. सादरकर्त्या - दिपाली केळकर
६ एप्रिल २०२१ : 'चादर ट्रेक - एक अविस्मरणीय अनुभव' उणे ४० अंश तापमान असलेल्या हिमालयातील गोठलेल्या नदीवरच्या ट्रेक चे अनुभव कथन. सादरकर्त्या - गार्गी भुसारी, मुलाखतकार - सचिन भुसारी.
अहवाल लिहिताना खरं म्हणजे मन खूप निराशेने भरून आलं होते. आमच्यासारख्या भावना या सगळ्यांच्याच असतील. कोरोना विरुद्धच्या या लढ्यात घरात एकटं बसावं लागत आहे. कुणालाही भेटता येत नाही, कधी शहर,कधी राज्य तर कधी देश बंद ठेवला जात आहे. जगाच्या अशा चित्रामुळे आपल्या मनात निराशेचं वातावरण निर्माण होणं साहजिकच आहे. आपण सकारात्मक विचार करून कोरोनावर लवकरात लवकर मात करू असा निश्चय सर्वांनी करूया , नव्हे असे उद्दिष्ट ठेऊन त्यात यशस्वी होऊ हे नक्की!
धन्यवाद !

**नंदिनी हंबर्डे (कार्यवाह)** **प्रियांका मोकाशी (अध्यक्ष)**

**अभिप्राय -**
**एखादी संस्था किती वेगवेगळ्या स्तरांवर काम करू शकते याचं महाराष्ट्र सेवा संघ हे उत्कृष्ट उदाहरण आहे. ग्रंथालये ही समाजाची एक दिशा असते. ते ज्या प्रकारे जतन केलं आहे , कात्रणे संग्रहित केली आहेत, ते मोलाचं आहे. संस्थेला मन:पूर्वक शुभेच्छा**

**...प्रतिमा जोशी, ०४.०१.२०२१**

**पुस्तकाच्या सहवासाचा आनंद माझ्यासाठी सर्वात मोठा आनंद असतो. ग्रंथालयात आलो की आपल्या जवळच्या आप्तांना भेटल्याचा आनंद मिळतो. आत्ता या क्षणी तीच भावना आहे. त्यातही मराठी भाषा दिनी हा योग आला आहे हे मोठे सुख. येथील मांडणी, व्यवस्था आणि मराठी भाषेवरील प्रेम पाहून भाषेच्या भविष्याची काळजी कमी झाली. माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा !!**
**...श्रीकांत बोजेवार, २७.०२.२०२१**



Ahval text20 21.indd 12 7/24/2021 1:39:59 PM

# विद्याझंकार कला विभाग



अध्यक्ष : र. द. लाड, कार्यवाह वि. म. सौदागर
सदस्य : प्रकाश सडेकर, मेधा दिवेकर, सुषमा पाटणकर, मुग्धा गोळे, श्रेयसी मंत्रवादी, अरुण भंडारे, वैदेही फडणीस

कला विभाग - वार्षिक अहवाल वर्ष २०२०-२१
रसिकहो, अत्यंत खेदपूर्वक इथे नमूद करावे लागत आहे की कदाचित संस्थेच्या इतिहासात प्रथमच आम्ही करोना विषाणूच्या जबरदस्त तडाख्यामुळे वर्षभरात अपवादात्मक सुद्धा रसिकरंजन, प्रबोधन करू शकलो नाही. या विषाणूचा तडाखाच इतका मर्मभेदी होता की त्यातून सावरण्यास अवसरच मिळू शकला नाही. अगदी आत्तासुद्धा आपण सगळे एकाहून एक अशा कठीण परिस्थिती, प्रसंग, अडचणींना सामोरे जातच आहोत. आपण सगळे जगन्नियंत्याकडे प्रार्थना करू या की या महामारीचा लवकरात लवकर नायनाट व्हावा व पूर्वीप्रमाणेच बहारदार सांस्कृतिक, शैक्षणिक कार्यक्रमांचा आस्वाद घेण्यासारखे अच्छे दिन यावेत व त्या निमित्ताने आपली परस्परांची भेट व्हावी.

विनोद सौदागर, कार्यवाह | र. द. लाड , अध्यक्ष

# गिरिमित्र विभाग



हे अहवाल वर्ष कोरोना वर्ष म्हणूनच स्मरणात राहील. कोरोना महामारीच्या संकटाने संपूर्ण देशाला ग्रासून टाकले. कोरोनाच्या पहिल्या लाटेने अनेक बळीही घेतले. अहवाल वर्षीच्या आपल्या गिरिमित्र संमेलनाचा बळी देखील कोरोनानेच घेतला असे दुर्दैवाने म्हणावेसे वाटते. कोरोनाचा गंभीर प्रादुर्भाव, सभागृह वापराची सरकारी नियमावली, व्यक्तींच्या एकत्र येण्यावर असलेली बंधने, करोना सुरक्षा संबंधीचे नियम इत्यादी कारणांमुळे संमेलन आयोजित करणे शक्य नव्हते आणि त्यामुळे ह्या वर्षीची गिरिमित्र वारी होऊच शकली नाही. प्रतिवर्षी जुलै महिन्यात सेवा संघाकडे वळणारी गिरीमित्रांची पावले या वर्षी त्यांच्या घरीच थबकली. विभागाच्या बैठका होऊन तयारीला सुरुवात ही झाली होती, जुलै ऐवजी डिसेंबर, ऑन लाईन संमेलन असे विविध पर्याय ही चाचपण्यात आले मात्र कोणताही पर्याय प्रत्यक्षात आणण्यासारखी परिस्थिती नव्हती व नाईलाजाने संमेलन रद्द करावे लागले. त्याचप्रमाणे गिरिमित्रविभागातर्फे आयोजिण्यात येणारे विविध कार्यक्रम देखील होऊ शकले नाहीत.
या आर्थिक वर्षात विभागाने एकच कार्यक्रम आयोजित केला. मात्र हा कार्यक्रम करावयाची वेळच आली नसती तर आनंद झाला असता. गिरिमित्र संमेलनाचे संस्थापक, आधारस्तंभ, समस्त गिरिमित्रांचे लाडके सर आणि इतिहास संशोधक स्व.रवींद्र लाड यांचे १६ जानेवारी २०२१रोजी दु:खद निधन झाले. त्यांचे जाणे सर्वांसाठीच अकल्पित आणि धक्कादायक होते. स्व.लाड यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी एका स्मरण सभेचे आयोजन १३ फेब्रुवारी २०२१ रोजी संस्थेच्या सभागृहात केले होते (हा एकमेव कार्यक्रम) स्मरणसभेच्या अध्यक्षपदी सेवा संघाचे अध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी आणि गिरिमित्र विभागाचे अध्यक्ष हृषिकेश यादव होते. लाड यांचे अनेक सुहृद , मित्र आणि विविध संस्थांमधील सहकारी यांनी त्यांच्या आठवणी जागवल्या. स्व.लाड यांच्या कर्तृत्वाचा आढावा घेणारी एक ध्वनिचित्रफीतही दाखवण्यात आली. स्व. लाड यांचे कुटुंबियही स्मरणसभेस उपस्थित होते. त्यांनीही त्यांचे मनोगत व्यक्त केले.
कोरोनाची दुसरी लाटही सुरूच आहे व सर्व बंधने तशीच कायम आहेत. त्यामुळे २०२१चे संमेलनही कठीणंच दिसतंय. आपण गिरिमित्र आहोत, तेंव्हा आपण सह्याद्रीची शिखरे, सुळके, गडकोट, तसेच हिमालयाच्या शिखरांना आवाहन करू आणि कोरोना संपवणायाचे मागणे मागू. गिरिमित्रांचे हे मागणे नक्कीच पूर्ण होईल व पुढचे संमेलन पूर्ण ताकदीने जोशात करू.
धन्यवाद !

किरण देशमुख, कार्यवाह | हृषीकेश यादव, अध्यक्ष
इतर सभासद : ॲड.रवी परांजपे, प्रसाद जोशी, अपर्णा भट्टे, अरुण भंडारे, राहूल मेश्राम, रमेश कुलकर्णी

# प्रेरणा पुरस्कार' व 'सॅल्यूट इंडिया'

समन्वयक - सतीश पाटणकर, नितीन देशपांडे

अहवाल वर्षाचा बराचसा भाग वेगवेगळ्या श्रेणींच्या टाळेबंदीत व्यतित झाला आणि डिसेंबर २०१९ च्या 'वीरशक्ती' प्रदर्शनाच्या धामधूमीत अनेक महिने गेल्यावर एक प्रकारे दीर्घ विश्रांतीच मिळाली. अर्थातच मोठ्या स्वरूपाचा कुठलाही दीर्घ कार्यक्रम करण्याची काहीच शक्यता नव्हती. त्यामुळे फक्त दोन निमित्ते साधून 'ऑन लाईन' कार्यक्रम आयोजित करून कार्यकर्त्यांनी आपली हौस भागवून घेतली.

करोना महामारीशी समस्त जगाचा लढा चालू असतानाच चीनने २०२० च्या जूनमध्ये गलवान खोऱ्यात आगळीक करून भारताला पुन्हा डिवचले. ह्या पार्श्वभूमीवर 'सॅल्यूट' तर्फे एक व्याख्यान (वेबिनार) आयोजित करण्यात आले. सुयश देसाई ह्या युवा अभ्यासकाने आपले अभ्यासपूर्ण निवेदन या निमित्ताने मांडले आणि 'पीएलए' ह्या चीनी प्रजासत्ताकाच्या सैन्याचे कूट धोरण आणि संधिसाधूपणा ह्यावर प्रकाश टाकला. दोन्ही देशांची धोरणे, सैन्याची ताकद व मर्यादा, 'एलएसी'वरील सद्यस्थिती अशा अनेक अंगांनी त्यांनी आपला अभ्यास मांडला. 'सॅल्यूट' चे मार्गदर्शक निवृत्त विंग कमांडर कोप्पीकर साहेब ह्यांनीही ह्या संदर्भात आपल्या अनुभवाचा आणि अभ्यासाचा सारांश मांडला. दुसरे निमित्त होते स्वातंत्र्य दिनाचे. दरवर्षी हा दिवस आपण झेंडावंदन करून, एकमेकांना भेटून, आपल्या पुढील योजनांची चर्चा करून साजरा करतो. १५ ऑगस्ट २०२० ला सगळे घरीच अडकून पडल्यामुळे हा राष्ट्रीय महत्त्वाचा दिवस 'सॅल्यूट'ने वेबिनार स्वरूपात साजरा करण्याचे ठरविले. मोठ्या प्रमाणावर हिमालय रांगांमध्ये आणि आसपास असलेली आपली उत्तर सीमा हीच सातत्याने अडचणीत येत असते आणि आपल्या देशाला इथेच आपले संरक्षण बळ मोठ्या प्रमाणात केंद्रित ठेवावे लागते. ह्यांत भूदल आणि हवाई दल ह्यांचा समन्वय आणि गरजेनुसार ह्या दोन्हींचा वापर हा मोठा व्यूहात्मक भाग असतो. अनेक काने कोपरे असे आहेत की तिथे हवाई दलाची सज्जता आणि अचूक वापर हा आपल्या मर्यादित सामुग्री आणि बळाचा जास्तीत जास्त परिणामकारक उपयोग करून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. १४ आणि १५ ऑगस्ट अश्या दोन्ही संध्याकाळी 'सॅल्यूट' ने या विषयावर ऑन लाईन कार्यक्रम आयोजित केला.

पहिल्या दिवशी निवृत्त एअर मार्शल अरुण गरुड,'चॅलेंजेस फॉर ऑपरेशन्स इन द हिमालयाज' या विषयावर बोलले. हिमालयाच्या भूप्रदेशातील प्रत्यक्ष परिस्थिती, अडचणी, आपल्या आणि पलीकडच्या बाजूला असलेला फरक, त्यामुळे आपल्याला अनुकूल बाबी आणि उलट काही अडचणी, लॉजिस्टिक्स मधले बारकावे, हवेतल्या हवेत इंधन भरून युद्ध विमानांच्या परिणामकारकतेत वाढ करण्याची सोय आणि हवाई दलाला भूदलाकडून दिली जाणारी पूरक मदत, त्यांच्यामधील समन्वय अश्या अनेक थरारक गोष्टी त्यांनी आपल्या सादरीकरणात समाविष्ट करून सहभागींना मोठी अभ्यासपूर्ण मेजवानीच दिली. रफायल, चिनूक आणि अपाचे बनावटीच्या अत्याधुनिक समावेशाबद्दलही त्यांनी सर्वांना संबोधित केले. भारतासाठी जमेच्या आणि अभिमानास्पद अशा अनेक गोष्टींवर प्रकाश टाकून एक प्रकारे त्यांनी आपल्याला चीनच्या ताज्या कुरापतीच्या गढूळ पार्श्वभूमीवर निःसंदिग्धपणे आश्वस्त केले. उपस्थितांना आपला स्वातंत्र्यदिन त्यामुळे अधिक ठळक अभिमानाने भारून साजरा करता आला असणार.

दुसऱ्या दिवशी प्रथम रोचन कुलकर्णी ह्या 'एनडीए' प्रवेशोत्सुक उमेदवारांना मार्गदर्शन करणाऱ्या, तरुण अभ्यासकाने त्यांचा विमाने, हेलिकॉप्टर्स, रणगाडे, युद्धनौका, रडार, विविध शस्त्रे ह्यांचा हौसेने आणि व्यक्तिशः केलेला संग्रह व्हिडिओ पद्धतीने दाखवला. विमानाची लाकडापासून सुरू झालेली प्रजावळ आता अत्याधुनिक अशा राफायल विमानापर्यंत पसरली आहे आणि आता तर मानवरहित वाहनापर्यंत ही मजल गेली आहे. ही सर्व मॉडेल्स त्यांनी स्वतः बनविलेली अथवा मिळविलेली अशी होती आणि त्यातून घरबसल्या उपस्थितांना आपल्या देशाच्या संरक्षण सामुग्रीचा आवाका घेता आला. रोचन यांनी अतिशय निगुतीने सांभाळलेला हा ठेवा तपशीलवार आपल्यासमोर ठेवला. अनेक तरुण आणि लहान मुलांच्या इतकाच सर्वांनाच तो अतिशय भावला आणि प्रेरितही करून गेला. त्यानंतर कोप्पीकर सरांनी 'चॅलेंजेस फॉर द इंडियन एअर फोर्स' ह्या विषयावर आपली अभ्यासपूर्ण मते मांडली. हवाई दलाच्या सामुग्रीत आणि सामर्थ्यात कशा सुधारणा होत गेल्या आणि त्यातही इलेक्ट्रॉनिक प्रणालीमुळे कशी वेगवेगळी आव्हाने निर्माण होत गेली, त्यावर कसे मार्ग काढण्यात आले ह्याचा धावता आढावाच त्यांनी घेतला. तंत्रज्ञानाच्या बरोबरीने धोरणात्मक सामर्थ्याने ह्या आव्हानांना कसे तोंड देणे शक्य आहे ह्यावरही आपली मते सांगितली व आलेल्या निवडक प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन शंका निरसन केले.

समन्वयक - सतीश पाटणकर, नितीन देशपांडे



Ahval text20 21.indd 14 7/24/2021 1:39:59 PM



# अर्थ विभाग

चंद्रशेखर वझे (अध्यक्ष) विजय वझे ( कार्यवाह)

सदस्य : प्रकाश सडेकर, अमिता ठोसर,तृप्ती राणे, वैदेही फडणीस, श्रेया देशपांडे, अरुण भंडारे, विजय वैद्य, विनय देसाई, विवेक दांडेकर, नितीन ढवळीकर, विनोद सौदागर, उल्हास हंबर्डे, विजय जोशी, संजीव गोखले, सुरेंद्र तारे, अवधूत गोळे

२०२० मार्च महिन्या पासुन सुरु झालेल्या कोविद–१९ च्या जागतिक महामारीच्या भीषण लाटेमुळे सर्व व्यवहारांवर निर्बंध येऊन देखील आपल्या संस्थेचा अर्थ विभाग हा सर्व वर्षभर कार्यरत होता. अर्थातच प्रत्यक्ष सभांना परवानगी नसल्याने अप्रत्यक्षपणे अद्ययावत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आभासी पद्धतीने अर्थ विभागाने आपली अर्थ प्रबोधन मालिका सुरु ठेवली आहे. ह्या मालिके अंतर्गत गेली वर्षभर महिन्याला एक अशी झूम ह्या प्रणालीच्या साहाय्याने सभा घेण्यात आल्या. ह्यांमध्ये खालील कार्यक्रम–विषय चर्चिले गेले.

| दिनांक | विषय | वक्ता |
|---|---|---|
| • ९एप्रिल २०२० | कोविड मध्ये गुंतवणुकीची धोरणे | : डॉ. अभिजित फडणीस, अर्थ अभ्यासक |
| • १० मे २०२० | भारतीय अर्थव्यवस्था–दशा आणि दिशा | : डॉ. सुनीती नागपूरकर, अर्थ तज्ज्ञ |
| • १७ मे २०२० | स्थावर मालमत्तेवरील भांडवली नफा | : सीए . चंद्रशेखर वझे (जूनचे सत्र ) |
| • २० जुलै २०२० | स्थावर मालमत्ता संदर्भातील कायदेशीर बाबी | : ॲडव्होकेट सविता पेठे |
| • ३० ऑगस्ट २०२० | शेअर्स खरेदीच्या वेगळ्या रणनीती | : पराग पेठे ,शेअर मार्केट तज्ज्ञ |
| • २० सप्टेंबर २०२० | रिझर्व बँक ऑफ इंडिया– सामान्य गुंतवणूकदाराच्या गुंतवणुकीची सुरक्षा | : दत्तात्रय काळे– निवृत्त मुख्य महाव्यवस्थापक - रिझर्व बँक ऑफ इंडिया |
| • ०१ नोव्हेंबर २०२० | करोनाच्या महामारीमध्ये सामान्य माणसांना दिलासा देणारे नवउद्योजक | : मकरंद पाटील– यशस्वी उद्योजक (ऑक्टोबर चे सत्र) |
| • १५ नोव्हेंबर २०२० | दिवाळी ते दिवाळी ग्रहांची भ्रमंती आणि शेअर मार्केट | : डॉ. अभिजित फडणीस,अर्थ अभ्यासक आणि सौ वर्षा लेले, ज्योतिष विशारद |
| • २८ नोव्हेंबर २०२० | कोविड१९, जगातील इतर घडामोडी आणि शेअर मार्केट | : अरविंद चारी फंड मॅनेजर– क्वांटम फंड (डिसेंबरचे सत्र) |
| • ०२ जानेवारी २०२१ | कवड्या ते आभासी चलन उत्क्रांती | : जयराज साळगावकर, प्रतिथयश उद्योजक व अर्थ अभ्यासक |
| • ०६ फेब्रुवारी २०२१ | केंद्रीय अर्थसंकल्प २०२१ – कोविडग्रस्त अर्थव्यवस्थेला संजीवनी देणारी लस आहे का ? | : दीपक करंजीकर, अर्थतज्ज्ञ, अभिनेता आणि सी.ए. संजीव गोखले (विशेष अर्थसंकल्प सत्र) |
| • २७ फेब्रुवारी २०२१ | जागतिक स्थित्यंतरे आणि त्यांचे गुंतवणूकीवर परिणाम | : डॉ.अभिजित फडणीस, अर्थ अभ्यासक |
| • २० मार्च २०२१ | शेअर्स खरेदीचं तंत्र आणि मंत्र | : सौरभ गुप्ता, फंड मॅंनेजर क्वांटम अॅसेट मॅंनेजमेंट कं |

अर्थ विभागाने प्रायोगिक तत्वावर सुरु केलेल्या अर्थ–गप्पा ह्या संकल्पनेलाही अर्थ मित्रांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. प्रथम सहा महिन्याच्या (जुलै२०१९ ते डिसेंबर २०१९) कालावधी नंतर दुसऱ्या सहा महिन्याच्या (जानेवारी २० २० ते जून २०२०) अर्थगप्पा देखील उत्तम जमल्या. ही सत्रे नाममात्र सशुल्क होती . वक्ता आणि श्रोता अशी विभागणी नसलेल्या ह्या परस्परसंवादी सभांमध्ये अनेक अर्थ मित्रांनी आपली गुंतवणूक धोरणे, त्यावरील कर, ॲसेट ॲलोकेशन , शेअर मार्केट ह्या विषयांवर मते मांडली.बरे–वाईट अनुभव सांगितले



Ahval text20 21.indd 15 7/24/2021 1:39:59 PM

मात्र दुसऱ्या सत्रातील शेवटच्या तीन अर्थ–गप्पा सभा ह्या प्रत्यक्ष सभांवर बंधने असल्याने अप्रत्यक्षपणे (आभासी पद्धतीने) घेण्यात आल्या. त्यात एप्रिल महिन्यात गुंतवणूक सल्लागार प्रिती झेंडे , मे महिन्यात सी.ए. तृप्ती राणे आणि शेवटच्या जून महिन्यात सी.ए. संजीव गोखले यांनी अर्थमित्रांच्या शंका आणि प्रश्नांबद्दल मार्गदर्शन केले.

अर्थ विभागाने काळाशी ताळमेळ साधत संवाद–साधना मध्ये बदल केला आहे. आता या सभांचे रेकॉर्डिंग देखील फेसबुक च्या अर्थविभागाच्या पानावर उपलब्ध आहे . तसेच यू ट्यूबवरही यातील काही कार्यक्रम आहेत. या नवीन तंत्रज्ञान मुळे भोगोलिक कक्षा रुंदावत आता अर्थविभाग आता दूरस्थ अर्थमित्रदेखील जोडू लागलाय.

कोविद–१९ च्या जागतिक महामारीच्या पहिली लाट आणि सध्याची दुसरी लाट संपूर्ण समाजालाच बंधनात अडकवत आहे. मात्र महाराष्ट्र सेवा संघ मुलुंड सारख्या संस्थांशी असलेली हितचिंतकांचे बंध मात्र अबाधित राहो ही प्रार्थना. हे संकट लवकर टळो ,त्याला तोंड द्यायला सगळ्यांना उत्तम मानसिक , आर्थिक, शारीरिक सामर्थ्य मिळो आणि त्यातून ते विजयी होवोत , धास्ती जावो आणि सर्वत्र खुशाली नांदो हीच त्या परमेश्वर चरणी मन:पूर्वक प्रार्थना.

विजय वझे , कार्यवाह — चंद्रशेखर वझे, अध्यक्ष

## साहित्य सम्राट न.चिं. केळकर ग्रंथालय

**अध्यक्ष :** नंदिनी हंबर्डे , कार्यवाह - अरुण भंडारे

सभासद : सुषमा पाटणकर, रवींद्र लाड, विनोद सौदागर, सदाशिव पोतदार, अनंत जोशी, मेधा देव, अर्चना कामत, सुहास कराडकर

स्थापना : १ मे १९७९, भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर पुरस्कारप्राप्त ‘अ’ वर्ग ग्रंथालय

एखादे चांगले पुस्तक आपल्याला कठीण प्रसंगातून वाट काढायला मदत करते. आपल्या मनाला उभारी देते. 'The very existance of Libraries affords the best experience that we may have hoped for the future of Man' T.S. Eliot
मानवाच्या भविष्याबद्दल आशावादी असण्याचा एक सज्जड पुरावाच ग्रंथालयाचे नुसते अस्तित्वच आपल्याला देते.

गेल्या वर्षी मार्च २०२० मध्ये संपूर्ण देशावर कोसळलेल्या महामारीच्या संकटाने आपल्या सर्वांचीच आयुष्ये, मने, सैरभैर करून टाकली होती. एक प्रकारचे भय, भीती मनात बाळगून जगायला एप्रिल २०२० पासून आपण सुरुवात केली. सक्तीच्या टाळेबंदीमुळे जगण्यावर अनेक निर्बंध आले. कोरोना बळींची संख्या मनात मृत्यूचे भय निर्माण करत होती. अशा पार्श्वभूमीवर ग्रंथ, ग्रंथालये एक वेगळा आधार असतो आपल्यासारख्या वाचकप्रेमींना! हा आधारच शासकीय आदेशाने हिरावला गेला. आपले ग्रंथालय बंद करावे लागले. जून २०२० मध्ये अनेक वाचकांच्या विनंतीला मान देऊन आम्ही ग्रंथालय सकाळी काही तासांसाठी सुरू केले. ज्येष्ठ, श्रेष्ठ वाचक जे घरी एकांतवासात बसून उबगले होते, त्यांना आम्ही पुस्तकांचा स्पर्श, सहवास परत दिला. पुढे कोरोनाची लाट आटोक्यात आली असे प्रशासनाला जाणवल्याने बंधने शिथिल झाली आणि ग्रंथालय ऑक्टोबरमध्ये पूर्ववत सुरू झाले. या चालत्या गाड्याला खीळ बसली ती एप्रिल २०२१ मध्ये शासनाने जाहीर केलेल्या कडक टाळेबंदीमुळे. या आर्थिक वर्षात ग्रंथालय फारसे कार्यक्रम सादर करू शकले नाही. फक्त दोनच कार्यक्रम आयोजित करता आले.

**नोव्हेंबर २०२०:** न.चिं केळकर ग्रंथालय आणि मैत्रेयीच्या संयुक्त विद्यमाने ऑगस्ट महिन्यात ‘मला काय वाटतं?’ या लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यातील विजेत्या स्पर्धकांना ७ नोव्हेंबर रोजी बक्षिसे प्रदान करण्यात आली.

**साहित्य साधना पुरस्कार :** २१ मार्च २०२१ : न. चिं केळकर ग्रंथालयातर्फे प्रतिवर्षी मराठी साहित्यातील कथा, कादंबरी, काव्य हे रूढ प्रचलित प्रकार बाजूला सारून वेगळ्या विषयावर लेखन करणाऱ्या साहित्यिकाच्या साहित्यकृतीला ‘साहित्य साधना’ पुरस्कार दिला जातो. या वर्षीचा पुरस्कार प्रख्यात रंगकर्मी, लेखक, दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे यांच्या ‘क्लोज एन्काउंटर’ या साहित्यकृतीला देण्यात आला. हा पुरस्कार खरं तर मागील वर्षी मार्चमध्ये द्यायचा होता. पण कोरोना महामारीमुळे जाहीर झालेल्या कडक टाळेबंदीमुळे हा सोहळा होऊ शकला नाही. या वर्षी २१ मार्चला मोजक्या निमंत्रितांच्या उपस्थितीत कोरोना संबंधीचे सर्व नियम पाळून सभागृहात हा सोहळा



Ahval text20 21.indd 16 7/24/2021 1:39:59 PM

आयोजित  करण्यात आला. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण 'झूम' आणि 'फेसबुक' च्या माध्यमातून करण्यात आले. प्रख्यात रंगकर्मी, दिग्दर्शक वामन केंद्रे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**'वाचकसंवाद'** हा ग्रंथालयाचा अभिनव उपक्रम. जे जे उत्तम आपण वाचले ते इतरांना सांगावे अशी रसिक वाचकांची इच्छा. टाळेबंदी आधी दर सोमवारी वाचक सेवा संघात एकत्र येत आणि आवडलेले पुस्तक , वृत्तपत्रीय लिखाण यावर मते व्यक्त करीत. टाळेबंदीमुळे हे अवघड झाले. त्यामुळे आम्ही 'व्हॉट्स ॲप' च्या माध्यमातून आभासी वाचक संवाद सुरू केले आणि त्याला उत्तम प्रतिसाद मिळतो आहे. आत्तापर्यंत ५४ आभासी संवाद झाले आहेत. संवादात अनेक नवीन विषयही चर्चेसाठी आणले गेले.

तर हे होते ग्रंथालयाचे कार्यक्रम. आम्ही आता वाट बघत आहोत कोरोना संपण्याची किंवा निवळण्याची, म्हणजे मग ग्रंथालय पुन्हा पूर्वीच्या जोमाने सुरू करता येईल.

अहवाल वर्षात महाराष्ट्र सेवा संघाच्या विश्वस्त, कार्यकारी मंडळ, सभासद, ग्रंथालय आणि कार्यालयीन कर्मचारी आणि आमच्या वाचकांकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल आभारी आहोत.

अरुण भंडारे (कार्यवाह)    नंदिनी हंबर्डे (अध्यक्ष)

## ज्ञानेश्वर पुस्तक पेढी अहवाल-२०१९/२०२०

कोरोना राथीमुळे अहवालवर्षी सर्व शाळा बंद असल्याने ज्ञानेश्वर पुस्तक पेढीतून विद्यार्थ्यांनी पुस्तके नेली नाहीत.

उमेश काणेकर-सेवक    श्रीमती  श्रद्धा गोविलकर (ग्रंथपाल)

### साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - ग्रंथस्थिती

| वर्षातील नवीन ग्रंथ खरेदी | वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ | एकूण |
|---|---|---|
| १०४ | १६१ | २६५ |

३१-३-२०२० रोजी उपलब्ध ग्रंथ - ३७,२२०

अहवाल वर्षात २६,२९० /- रुपये किमतीची ग्रंथखरेदी करण्यात आली.

**ग्रंथालय सभासद तपशील**

**३१-३-२०२१ अखेर सभासद**

| विशेष सभासद | बाल विभाग | ग्रंथ विभाग | ग्रंथ विभाग-सिटी ऑफ जॉय | |
|---|---|---|---|---|
| २०० | १११ | ६०४ | ३६ | |
| अंक विभाग | सन्माननीय सदस्य | सिटी ऑफ जॉय -बाल | ग्रंथ अधिक मासिक | एकूण सदस्य |
| १४३ | २ | ३ | १८ | **१११७** |

महाराष्ट्र सेवा संघातर्फे ऑक्सिजन कॉन्संट्रेटर्स ची सुविधा अल्प दरात उपलब्ध करण्यात आली आहे. गरजूंनी संस्थेच्या मुलुंड वा ऐरोली कार्यालयाशी कार्यालयीन वेळांत संपर्क साधावा.



Ahval text20 21.indd 17    7/24/2021 1:39:59 PM

**ग्रंथालयात दरमहा येणाऱ्या अंक, मासिके व साप्ताहिके यांचा तपशील**

| प्रकार | मासिके | त्रैमासिके | पाक्षिके | साप्ताहिके | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | १४ | - | - | ५ | १९ |
| हिंदी | ५ | - | २ | - | ७ |
| इंग्रजी | ११ | - | ६ | ५ | २२ |
| एकूण | ३० | – | ८ | १० | ४८ |

**दिवाळी अंक योजना २०२०-२०२१**

| | |
|---|---|
| सभासद संख्या | ९६ |
| अंकाचे प्रकार | ५० |
| अंकांच्या एकूण प्रती | १११ |
| खरेदी किंमत रुपये | १८,९१२/- |

**मोफत वाचनालय**

**कोरोना संदर्भातील शासकीय निर्बंधांमुळे अहवालवर्षी मोफत वाचनालय बंद होते.**

## दृष्टिसेवा अभ्यासिका

अध्यक्ष - सुनीता देवधर, कार्यवाह - रश्मी अनगळ, कोषाध्यक्ष - नंदिनी हंबर्डे

सभासद - प्रियांका मोकाशी, विनोद सौदागर, श्री. सदाशिव पोतदार, श्री. द.व. कुलकर्णी

माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाने कोरोना व टाळेबंदीमुळे ०३ मार्च २०२० ते २६ मार्च २०२० या कालावधीमध्ये आयोजित केलेल्या परीक्षेचे २३ मार्चपासून नंतरचे पेपर रद्द केले. दृष्टीसेवेच्या विद्यार्थ्यांचे 'भूगोल' आणि 'दूध व दुग्धजन्य पदार्थ' हे दोन पेपर्स रद्द झाले. या विषयांमध्ये विद्यार्थ्यांना बोर्डातर्फे सरासरी गुण देण्यात आले.

दिनांक २९ जुलै २०२० या दिवशी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. प्रतिवर्षाप्रमाणे सर्व १४ विद्यार्थी उत्तम गुणांनी यशस्वी झाले.

त्यांचे गुण असे :

१) रूपेश जाधव - ८०.८० %, २)अनिशा किलजे - ७९.४० %, ३)सुधाकर जाधव - ७७.४०%, ४) शीतल डोळस - ७६.२०%, ५) सोमनाथ खोपडे - ७५.८०%, ६) अमोल शार्दुल - ७५.४०%, ७) सविता वाडिले - ७३.८०%, ८) सुशांत मंडले - ७२.४०%, ९) आकाश मौर्य - ७२.२०%, १०) आकाश जाबरे - ७१.००%. ११) गंगाराम गायकवाड - ७०.६०%, १२) युवराज यादव - ६६.००%, १३) नाझिया मुस्तफा -५९.००%, १४) सनम खान - ५६%

वरील विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा कोरोना परिस्थिती न बदलल्याने अद्याप होऊ शकला नाही.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी २४ विद्यार्थ्यांची शालांत परीक्षा बोर्डात नोंदणी करण्यात आली. २४ विद्यार्थ्यांपैकी फक्त ७ विद्यार्थी मुंबईचे व उर्वरीत मुंबई बाहेरील असल्यामुळे व त्यांचे प्रत्यक्ष वर्ग घेणे शक्य नसल्यामुळे दि.१०ऑगस्ट२० पासून विद्यार्थ्यांचे 'ऑन लाईन' वर्ग सुरू करण्यात आले.

रश्मी अनगळ, कार्यवाह — सुनीता देवधर, अध्यक्ष



Ahval text20 21.indd 18 7/24/2021 1:39:59 PM


विज्ञान

# **विज्ञान विभाग** (विज्ञान प्रेमींचा मंच)

अध्यक्ष : सतीश पाटणकर, कार्यवाह : नितीन देशपांडे, विशेष सहभाग : गुरूप्रसाद कार्लेकर, विद्याधर जोशी
तरूण सदस्य : वैभव बुद्धदेव, चिन्मय देशमुख, अथर्व जोशी, जयश्री सोनावणे, वरदा नवाथे, रत्नेश गवळी, मृणाल थोरात, चिन्मयी वझे, जाई कुलकर्णी, सचिन वझे, अर्चित गोखले, अनिरुद्ध शेवळे, आदित्य पाटणकर

राष्ट्रीय विज्ञान दिन २०२१

यंदाच्या विज्ञान दिनावर कोरोनाचे सावट असल्याने ' विज्ञान दिवस' दरवर्षीप्रमाणे दणक्यात साजरा करता येणार नाही अशी चिन्हे दिसत होती. परंतु लॉकडाऊनच्या काळात विभागाने अनेक ऑनलाईन वेबिनार्स अत्यंत सहजतेने आयोजित केली होती. (त्याचा सविस्तर अहवाल सोबत दिला आहेच.) त्याच धर्तीवर विज्ञान दिवसासाठी काही वेगळं करता येऊ शकेल असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये होता. अर्थात अनेक शंकाही होत्या मनात. विद्यार्थी त्यांच्या संघासोबत एकत्र बसू शकतील का? कोणत्या स्पर्धांचे आयोजन करता येईल? कार्यक्रमाचं एकंदर स्वरूप कसं असेल? असे अनेक प्रश्न होते. शेवटी प्रयत्न करून बघूया असं म्हणून दर शनिवार– रविवारी ऑनलाईन बैठक भरवण्याचा निर्णय झाला.

